Shri Siddheshwar Devasthan, Solapur.
**Shree Siddheshwar Women's College of Engineering, Solapur**
Approved by AICTE, New Delhi, Recognised by Govt. of Maharashtra & Affiliated to DBATU, Lonere
E-mail: office@sswcoe.edu.in | Website: www.sswcoe.edu.in| Phone 0217- 2627227
T.P.S. II, Final Plot No. 74, Bhawani Peth, Rupa Bhawani Road, Solapur – 413002

दिनांक : २३/०७/२०२४.

# नोटीस

**विषय : व्यासायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमल बजावणीबाबत.**

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन- उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र.शिष्युवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४ दि. ०८ जुलै २०२४.
२) महाराष्ट्र शासन- उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.शिष्युवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४ दि. १९ जुलै २०२४.
३) महाराष्ट्र शासन- शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) विभाग यांचे परिपत्रक क्र.उशिसं/शिष्य-२०२४- २५/ मुमोशि/३८५३. दि. १९ जुलै २०२४.
४) महाराष्ट्र शासन- तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे विभाग यांचे परिपत्रक क्र.तंशिविकापू/विवि/महाडीबीटी २०२४-२५/१००%शिक्षण शुल्क /२०२४/२९६८. दि. २२ जुलै २०२४.

उपरोक्त विषय व संदर्भ क्र. १ ते ४ मधील निर्णयान्वे महाराष्ट्र राज्यातील शासकीय महाविद्यालये , शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसाहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या उपकेंद्रातील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्रधिकरणामार्फत राबवण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यस्थापन कोठ्यातील व संस्थास्तारावरील प्रवेश वगळून) नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या पात्र विद्यार्थीनी पैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/- (आठ लाख) किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिक दृष्ट्या मागास (EBC) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्ग (OBC) व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) यांना सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षणशुल्क (Tuition Fee) व परीक्षाशुल्कच्या ५०% लाभा ऐवजी १००% लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने शासन व संबंधित खात्यांकडून प्राप्त शासन निर्णय व परिपत्रके यासोबत पालक, विद्यार्थिनी व इतर घटकास माहितीस्तव प्रसिद्ध करीत आहे.

(डॉ. टी. ए. चव्हाण)
प्राचार्य

प्रत.:

१. सर्व विभागप्रमुख यांस विद्यार्थिनीच्या माहितीस्तव
२. समन्वयक, संकेतस्थळ यांस संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी
३. नोटीस बोर्ड

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४**
**मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.**
**दिनांक: ०८ जुलै, २०२४.**

संदर्भ: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि.३१.०३.२०१६.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी २०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण -१, दि.३१.०३. २०१६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.०६.०४.२०२३

**प्रस्तावना :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषि व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्त्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठवळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विचाराविनिमयाअंती पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -:** राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस,



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांकडून आर्थिक तरतूदी सुधारीत करुन, सदर योजनेचा निधी हा संबंधित प्रशासकीय विभागांच्या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात यावा. तसेच, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क लाभाच्या अंमलबजावणीकरिता सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार स्वतंत्र आदेश निर्गमित करावे.

४. मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करतांना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रा ऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारीत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

आ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येत आहे.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

६. संबंधित प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे त्यांच्या शासन निर्णयांमध्ये सुधारणा करावी. याव्यतिरिक्त योजनेच्या अन्य अटी-शर्ती व कार्यपध्दती कायम राहतील.

७. सदर शासन निर्णय हा दि.०५.०७.२०२४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(सतीश तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
५. मा.सभापती/उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
१३. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१६. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१७. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
१८. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
१९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

२७. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२८. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे

२९. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड

३०. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

३१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

३२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

३३. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)

३४. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)

३५. महालेखापाल - १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर

३६. महालेखापाल - १ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर

३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

३८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

३९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

४०. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक

४१. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

४२. सर्वसंबंधित कार्यासने (तांशि-३/विशि-३/मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

४३. निवडनस्ती/तांशि-४.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

**आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १९ जुलै, २०२४.

**वाचा:** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि.१४.०२.२०१८.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८.०७.२०२४.

**शासन परिपत्रक :** उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रकियेद्वारे / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. आतापर्यंत व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना (मुले व मुली) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात येत होती. परंतु, उपरोक्त वाचा क्र.०३ येथील शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित वरील प्रवर्गातील मुलींना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ५० टक्के ऐवजी १०० टक्के शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच, ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी, असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना वाचा क्र.०२ येथील परिपत्रकान्वये यापूर्वी दिलेल्या आहेत. असे असतानाही राज्यातील काही शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरत असल्याच्या किंवहुना शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थी, पालक, विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त होत आहेत.

३. वरील पार्श्वभूमीवर आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनां उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देताना, त्यांच्याकडून शिक्षण शुल्क न आकारण्याबाबत शैक्षणिक संस्थांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्यावेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेऊन, त्यांना प्रवेश देण्यात यावा.

२) शैक्षणिक संस्थांनी योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देऊन, संबंधित योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरण्याबाबत कळवावे.

४. आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काच्या रकमेचा भरणा करावा.

५. संबंधित संचालनालयाने परीक्षा शुल्काची रक्कम योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या आधार-संलग्नित बँक खात्यात थेट जमा करावी. तसेच, शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करावी. प्रवेशाच्यावेळी संस्थांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास, सदर रक्कम संस्थेने विद्यार्थ्यांना परत करावी.

६. वरील सूचना संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व संचालक, कला संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या तसेच, विद्यापीठांच्या निदर्शनास आणून, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश द्यावेत. सदर सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुध्द कारवाई करावी.

७. संबंधित संचालकांनी सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी. तसेच, संचालनालयांच्या संकेतस्थळावर हे परिपत्रक प्रसिध्द करावे.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७१९१८५७३३५४०८ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SHAHAJAHAN SHAKUR MULANI

Digitally signed by SHAHAJAHAN SHAKUR MULANI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SHAHAJAHAN SHAKUR MULANI
Date: 2024.07.19 19:09:01 +05'30'

(शहाजहान मुलाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
८. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
९. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१०. सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
११. अवर सचिव (मशि-२ व तांशि-६), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती/तांशि-४.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे ४११ ००१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.020/26126939/2970798


क्र.उशिसं/शिष्य-2024-25/मुमोशि/ ३८५३ दि. 19.07.2024

परिपत्रक 19 JUL 2024

**विषय :- उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अमंलबजावणी बाबत**

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ.-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८.०७.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येतो.

तसेच संदर्भाधिन शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process — CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजावणी करणेकरीता महाविद्यालयांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करावी.
२. महाविद्यालयातील प्रवेश प्रकियेच्या प्रमुखाने प्रवेशावेळी सर्व पात्र मुलींना सदरहू योजनेची सविस्तर माहिती तसेच शिष्यवृत्तीची पूर्वतयारी करणेकरीता आवश्यक कागदपत्रांची माहिती द्यावी.
३. सदरहू योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता महाविद्यालयामधील जाणकार अध्यापकांची स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) म्हणून नेमणूक करण्यात यावी.
४. महाविद्यालयाच्या स्तरावर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांबाबत माहिती होणेकरीता तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेकरीता स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र शिष्यवृत्ती कक्ष निर्माण करण्यात यावा.
५. मुलींना मोफत शिक्षण या योजनेबाबतची सविस्तर माहितीचा फलक महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावावा. सदरहू फलक हा महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ तसेच विद्यार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात ठळकपणे येईल अशा स्वरुपात लावण्यात यावा.

६. शिष्यवृत्ती योजनांचे आवेदन पत्रे सादर करणेबाबत प्रात्यक्षिक प्रशिक्षण (Hands on Training) महाविद्यालयाच्या स्तरावर आयोजित करावे.

७. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेकरीता महाविद्यालयातील स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांचा संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावावा.

वर नमुद केल्यानुसार मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालयामधील स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांची नाव, पदनाम व संपर्क क्रमांक याबाबतची माहिती संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे तात्काळ सादर करावी. तसेच मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना अहवाल सादर करावा. तसेच कोणतीही पात्र विद्यार्थीनी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था.

प्रत :- १. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

उक्त परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजवणी करणेकरीता महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. तसेच योजनेच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

प्रत :- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२४-२५/१००% शिक्षण शुल्क/२०२४/ 2968

दिनांक : १९.०७.२०२४

22 JUL 2024

**परिपत्रक:**

प्रति,
संचालक / प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय :** व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत..

**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई शा.निर्णय क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४ दिनांक ०८ जुलै, २०२४.

२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन परिपत्रक क्र शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४ दिनांक १९ जुलै, २०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून निर्गमित झालेल्या संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणा-या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process - CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणा-या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, संदर्भ क्रमांक २ मधील शासन परिपत्रकान्वये आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्ग (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC), प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम न घेणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

**त्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणा-या मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजावणी करणेकरीता संस्थांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.**

१. मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करावी.

२. संस्थेतील प्रवेश प्रक्रियेच्या समन्वयकांनी प्रवेशावेळी सर्व पात्र मुलींना सदरहू योजनेची सविस्तर माहिती तसेच शिष्यवृत्तीकरिता आवश्यक कागदपत्रांची माहिती द्यावी.

३. मुलींना मोफत शिक्षण योजनेबाबतची सविस्तर माहितीचा फलक संस्थेच्या दर्शनी भागात लावावा. सदरहू फलक हा संस्थेच्या प्रवेशद्वाराजवळ तसेच विद्यार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात ठळकपणे येईल अशा स्वरुपात लावण्यात यावा.

४. महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज करणेबाबत प्रात्यक्षिक प्रशिक्षण (Hands on Training) संस्थास्तरावर आयोजित करुन, संबंधित योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरणाबाबत कळवावे व अर्ज भरुन घ्यावेत.

५. सक्षम प्राधिका-यामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्या वेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश द्यावा. ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेऊन, त्यांना प्रवेश देण्यात यावा. योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम महाडीबीटीमार्फत संस्थेत बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

६. आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काच्या रकमेचा भरणा करावा. परीक्षा शुल्काची रक्कम योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बॅंक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

७. संदर्भिय परिपत्रकानुसार दिलेल्या उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, ज्या संस्था सूचनांचे पालन करणार नाहीत किंवा ज्या संस्थेविरुध्द विद्यार्थ्यांची अथवा पालकांची तक्रार या विभागीय कार्यालयाकडे प्राप्त झाल्यास अशा संस्थेविरुध्द कारवाई करण्यात येईल याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (कार्यासन क्र. २ व १०) यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजीकल युनिर्व्हसीटी, लोणेरे.
३. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
५. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
६. कुलसचिव, सीओईपी टेक्नॉलॉजीकल युनिर्व्हसीटी, पुणे.

# उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजना

## प्रश्नोत्तरे

| | |
|---|---|
| १ | **राज्य शासनाने उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी चे शिक्षण मोफत केले हे खरे आहे काय ?** |
| ➩ | होय, हे खरे आहे.<br>शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थीनींनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवास धारक व वादग्रस्त महाराष्ट्र - कर्नाटक सीमा क्षेत्रातील ज्या विद्यार्थीनी विहित अटी व शर्तींची पूर्तता करतील अशा सर्व पात्र मुलींना या योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून पुढे लागू राहील.<br>पालकांचे रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या मुलींच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी चे शिक्षण मोफत केले आहे. |
| २ | **या योजनेसाठी अर्ज कोठे करावा ?** |
| ➩ | सदर योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे (https://mahadbt.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावरुन विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यात यावा. |
| ३ | **मुलींना मोफत शिक्षण योजना या योजनेत कोणत्या शुल्काचा समावेश आहे ?** |
| ➩ | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमांचे वार्षिक शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क (Tuition Fee व Exam Fee) या शुल्काचा समावेश आहे.<br>व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शुल्क नियामक प्राधिकरण व बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेले १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल.<br>सदरचे शुल्क हे शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता संबंधित विद्यापीठ, तंत्रशिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ इत्यादी कडून आकारण्यात येणारे परीक्षा शुल्क व शासन मान्यता प्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे १०० टक्के मर्यादेपर्यंत परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात पात्र विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल. |
| ४ | **अर्ज भरावयाची अंतिम मुदत कोणती ?** |
| ➩ | याबाबत वेळोवेळी स्वतंत्रपणे महाविद्यालयांना निर्देश देण्यात येतात. तसेच अर्ज भरण्याबाबतचे वेळापत्रक महाडीबीटी पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येते. (https://mahadbt.maharashtra.gov.in) |
| ५ | **या योजनेच्या लाभासाठी अर्जासोबत कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत ?** |
| ➩ | १. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्याचा पुरावा.<br>२. अधिवास प्रमाणपत्र - सक्षम प्राधिकरणाने दिलेले<br>३. उत्पन्न प्रमाणपत्र - कुटूंबातील दोन्ही पालकांचे मागील वर्षाचे एकत्रित उत्पन्न प्रमाणपत्र. सदर प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांचे असावे. |

| | |
|---|---|
| | ४. लहान कुटुंबाचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.<br>५. अभ्यासक्रमात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र<br>६. नवीन अर्ज करतांना १० वी / १२ वी ची गुणपत्रिका आवश्यक तसेच नूतनीकरणे करीता मागील वर्षाची गुणपत्रिका आवश्यक आहे. |
| **६** | **ही कागदपत्रे कोठे उपलब्ध होतील ?** |
| ⇨ | अधिवास प्रमाणपत्र व उत्पन्न प्रमाणपत्र आपले सरकार पोर्टलद्वारे संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज केल्यास उपलब्ध होतील. (https://aaplesarkar.mahaonline.gov.in) |
| **७** | **ही योजना शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून लागू केली असल्याने या आधी प्रवेश घेतलेल्या व अभ्यासक्रम पूर्ण न झालेल्या पदवी अभ्यासक्रमातील मुलींना ही योजना लागू आहे का ?** |
| ⇨ | शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थीनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवास धारक व वादग्रस्त महाराष्ट्र – कर्नाटक सीमा क्षेत्रातील ज्या विद्यार्थीनी विहित अटी व शर्तीची पूर्तता करतील अशा सर्व पात्र मुलींना या योजनेचा लाभ **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पुढे लागू राहील.** |
| **८** | **माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असलेल्या / उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असलेल्या मुलींनी पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असल्यास पदविका अभ्यासक्रमासाठी सदर योजना लागू आहे का ?** |
| ⇨ | होय.<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ मध्ये नमुद असलेल्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना सदर योजना लागू आहे. |
| **९** | **प्रवेश घेताना मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क महाविद्यालयास भरावे लागणार आहेत का ?** |
| ⇨ | १. **शिक्षण शुल्क -** प्रवेश घेताना मुलींना शिक्षण शुल्क महाविद्यालयास भरावे लागणार नाही. सदर योजनेतंर्गत मुलींना अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित मुलींकडून प्रवेशाच्या वेळी आगाऊ स्वरुपात घेण्यात येऊ नये व विद्यार्थ्यांनीची पिळवणुक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल याबाबत विभागामार्फत निर्देश देण्यात येत आहेत.<br>२. **परीक्षा शुल्क** – पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारी परीक्षा शुल्क लाभाची रक्कम ही थेट स्वरुपात लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात संबंधित प्रशासकीय विभागाकडून वितरीत होणार असल्याने सदरचे शुल्क महाविद्यालयास भरणे आवश्यक आहे. योजनेसाठी आवेदनपत्र सादर केलेल्या व अटी व शर्तीची पूर्तता होत असलेल्या विद्यार्थीनीस या शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात येईल. |
| **१०** | **शैक्षणिक वर्ष जून पासून सुरु झाले असल्याने यापूर्वी प्रवेश घेतलेल्या मुलींनी महाविद्यालयाकडे भरलेले शिक्षण शुल्क मुलींना परत मिळणार का ?** |
| ⇨ | होय.<br>सदर योजना शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थीनीनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा विद्यार्थीनीसाठी लागू असल्याने सन २०२४-२५ साठी प्रवेश घेतलेल्या मुलींच्या महाविद्यालयाकडे भरलेल्या शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | याकरीता शिक्षण शुल्क भरलेले असेल तर अर्ज करतेवेळी भरण्यात आलेले शिक्षण शुल्क नमूद करण्यात यावे. |
| ११ | **सदर योजना कायम विनाअनुदानित महाविद्यालयामधील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू आहे का ?** |
| ⇨ | होय.<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ मध्ये नमुद असलेल्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना सदर योजना लागू आहे. |
| १२ | **या योजनेचा लाभ कुटूंबातील किती मुलींना लागू आहे ?** |
| ⇨ | या योजनेचा लाभ कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपुरता मर्यादित आहे ? |
| १३ | **दुरस्थ अथवा अर्धवेळ स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मुलींना या योजनेचा लाभ घेता येईल ?** |
| ⇨ | नाही.<br>सदर योजना पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी मागील सत्रातील किमान ५० टक्के उपस्थितीची अट पूर्ण करणाऱ्या मुलींना लागू आहे. |
| १४ | **या योजनेच्या लाभासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे का ?** |
| ⇨ | होय.<br>महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम २०१६ अन्वये दिनांक १३.०४.२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द केलेली अधिसूचना (असाधारण क्रमांक ८७) व दि. १५.०४.२०१७ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार ऑनलाईन अर्जासोबत पात्र इच्छुक अर्जदारांनी त्यांचा आधार क्रमांक देणे आवश्यक आहे. तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्रापत करुन घ्यावयाची आहे असे खाते ऑनलाईन अर्जासोबत दिलेल्या आधारक्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. |
| १५ | **सदर योजना कोणत्या प्रवर्गासाठी लागू आहे ?** |
| ⇨ | सदर योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EBC/ EWS), इतर मागास प्रवर्गातील (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील पात्र मुलींना लागू आहे. |
| १६ | **ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींबाबत कोणाशी संपर्क करावा ?** |
| ⇨ | १. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/ नोडल अधिकारी.<br>२. संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयातील शिष्यवृत्तीचे काम पाहणारे नोडल अधिकारी / कर्मचारी.<br>३. MahaIT च्या महाडीबीटी पोर्टलवरील "Grievance Section" मध्ये अडचणींची नोंद करावी. |

| | |
|---|---|
| १७ | **योजनेबाबतची सखोल माहिती / मार्गदर्शक तत्वे कोठे पाहावयास मिळतील ?** |
| ⇨ | महाडीबीटी पोर्टलवर योजनेची संपूर्ण माहिती नमूद आहे.<br>उच्च शिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ https://dhepune.gov.in, तंत्र शिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ https://www.dtemaharashtra.gov.in तसेच कला संचालनालयाचे https://doa.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर सुध्दा योजनेची संपूर्ण माहिती नमूद आहे. |
| १८ | **विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करते वेळी पूर्वतयारी म्हणून कोणत्या बाबी आवश्यक आहेत ?** |
| ⇨ | १.आधार संलग्नित बँक खाते<br>२.महाविद्यालयांची प्रवेश पावती (Scanned Copy)<br>३. अधिवास प्रमाणपत्र.<br>४. उत्पन्न दाखला. |
| १९ | **अर्जाची पडताळणी कशा प्रकारे केली जाते ?** |
| ⇨ | अर्जदाराने महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छाननी खालील ३ स्तरावर करण्यात येते.<br>१. महाविद्यालय<br>२. विभागस्तर<br>३. संचालनालय (राज्यस्तर) |
| २० | **अर्ज भरतेवेळी काही त्रुटी/ चुकीचा भरला गेल्यास अर्ज जमा केल्यानंतर अर्जाची दुरुस्ती कशी करता येते का ?** |
| ⇨ | होय.<br>ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यात दुरुस्ती करावयाची झाल्यास संबंधित महाविद्यालयाशी संपर्क करुन आवेदनपत्र कोणत्या स्तरावर आहे याबाबत पाहणी करुन दुरुस्तीस संधी देण्यात येते. तथापि राज्यस्तरावरुन अर्ज नामंजूर होण्यापूर्वी विहित मुदतीत सदर बदल करण्याची सुविधा आहे. |
| २१ | **विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली किंवा कसे याबाबतची माहिती कशी समजू शकेल ?** |
| ⇨ | आवेदनपत्र सादर करतेवेळी विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा User Id व Password उपलब्ध होतो, याआधारे शिष्यवृत्ती अर्जावर होत असलेली कार्यवाही विद्यार्थ्यास ऑनलाईन दिसून येते. |
| २२ | **मंजूर शिष्यवृत्ती किती टप्प्यात बँक खात्यात जमा केली जाते ?** |
| ⇨ | मंजूर शिष्यवृत्ती सत्र निहाय दोन टप्प्यात बँक खात्यात जमा केली जाते. |
| २३ | **या योजने अंतर्गत लाभ प्राप्त करण्याकरिता केवळ CAP मार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशीत विद्यार्थीनी पात्र आहेत काय ?** |
| ⇨ | होय.<br>व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता दरवर्षी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (Centralized Admission Process - CAP) मार्फतच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनींकरिता ही योजना लागू आहे. |

| | |
|---|---|
| २४ | **इतर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेले विद्यार्थीनी सदरहू योजमेचा लाभ घेऊ शकतात का ?** |
| ➪ | नाही.<br>शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थीनी पात्र असेल. |
| २५ | **सदरहू योजना कोणास लागू नाही.** |
| ➪ | खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे यामध्ये प्रवेशित विद्यार्थीनी तसेच व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश घेणाऱ्या मुलींना सदरहू योजना लागू नाही. |

------------------------